MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES
EXAMINATION BOARD
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ
MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411 007
020-25528519/119 https://www.mcaer.org/maueb.html E-mail: mauebpune@yahoo.co.in

जा.क्र. मकृविपमं/Ph.D-CET-2024/बातमी-१/ **२१३** /२०२४ दिनांक : १९.०७.२०२४

# प्रसिध्दीसाठी बातमी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२४ (Ph.D-CET-2024) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत माहे सप्टेंबर २०२४ महाराष्ट्रातील ६ केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदव्युत्तर अभ्याक्रमाचे विद्यार्थी तसेच सन २०२४-२०२५ या पदव्युत्तर शैक्षणिक वर्षाच्या अंतिम सत्रांत परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहातील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वत: भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचणे अत्यावश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी **दि. २०.७.२०२४ ते ०३.८.२०२४** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने नेट बँकीग किंवा डेबिट/क्रेडीट कार्डव्दारे **दि. २०.०७.२०२४ ते दि. ०५.०८.२०२४ (दुपारी ३:००)** पर्यंत स्वीकारले जाईल. हया परिक्षेसंबंधित अर्ज महारष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

पात्र उमेदवारांची तात्पुरती यादी दिनांक १०.०८.२०२४ रोजी वरील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध होईल. दि. ११.०८.२०२४ ते १६.०८.२०२४ या कालावधीत अर्ज बाबतच्या तक्रारीचे निर्वाण करण्यात येईल. त्यानंतर पात्र उमेदवारांची अंतिम यादी दि. २०.०८.२०२४ ला वरिल संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवारांनी आपले **परीक्षा प्रवेश पत्र** (Admit Card) वरील संकेतस्थळावरून दि. १०.०९.२०२४ पासुन डाऊनलोड करून घ्यावयाचे आहेत.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेच्या **संभाव्य दि. २२.०९.२०२४** असून परीक्षेचा निकाल दि. १४.१०.२०२४ रोजी **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे वरील संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या परिक्षेसंदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८५१९/११९ या दूरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा किंवा cetmauebpune@gmail.com या ई-मेल वर कळवावे,असे डॉ. अमोल देठे, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेव्दारे कळविण्यात आलेले आहे.

स्थळ : पुणे-७
दिनांक: १९.०७.२०२४

**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे**